10 sct DOC-7


नवी मुंबई महानगरपालिका

पहिला माळा, बेलापूर भवन, सी.बी.डी., नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्र. : २७५७ ७० ७०
२७५७ ५७ ००
फॅक्स : २७५७ ३७ ८५

Navi Mumbai Municipal Corporation

1ST. FLOOR, BELAPUR BHAVAN, C.B.D., NAVI MUMBAI - 400 614.
TEL. No. : 2757 70 70
2757 57 00
FAX : 2757 37 85


NMMC:TPM:CC:२०६५:२०१२-२०१३

जा.क्र./नमुंमपा/नरवि/बा.प./प्र.क्र.ए - १६५१२/ 3e6 /२०१३
दिनांक :- २४/०७/२०१३.

प्रति,
मेसर्स भगवती डेव्हलपर्स
भूखंड क्र.१२, सेक्टर -११,
घणसोली, नवी मुंबई

नस्ती क्र. - नमुंमपा/वि.प्र.क्र.१२६१/२०१२ प्रकरण क्र.ए - १६५१२

विषय :- भूखंड क्र.१२, सेक्टर -११, घणसोली, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- आपले वास्तुविशारद यांचा दि.२२-११-२०१२ रोजीचा अर्ज.

महोदय,

भूखंड क्र.१२, सेक्टर-११, घणसोली, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन जागेत निवासी व वाणिज्य उपयोगासाठी खालील तपशिलानुसार, मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ (१) (३) मधील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देणेत येत आहे.

बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. त्यातील अटी / शर्ती तसेच खाली नमूद केलेल्या बाबींचे पालन करणे आवश्यक राहील.

पाणी पुरवठा व मलनि:सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविणेत येईल किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे/सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक / भुखंडधारक / गाळेधारक यांची राहील. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भित बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्यापेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळयाचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भूखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भूखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारित बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

इमारतीचे बांधकाम करणारे मजुरांचे निवासाकरीता **(Labour Shed)** भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातुन त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजुचे सामासिक अंतरात ३.०० मी. रुंदीचे तात्पुरती शेडस् टॉयलेट करण्यास करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढुन टाकणेत यावी.



"जन्म असो वा मरण आवश्यक नोंदणीकरण"